• बरखाद्वारे संगीतकार चित्रगुप्त यांची सामाजिक चित्रपटातील प्रतिष्ठा वाढली. • १९३९, १९५९ आणि १९७१ सालच्या तिन्ही *कंगन*मध्ये अशोककुमारची भूमिका होती.

□ इसाक मुजावर

बरखा(१९५९):

१९५८ साली चित्रगुप्तनी *चालबाज, बालयोगी उपमन्यू, डॉटर ऑफ सिंदबाद, माया बाजार, राज सिंहासन, सन ऑफ सिंदबाद, टॅक्सी स्टॅण्ड, तिसरी गल्ली, जिम्बो* या नऊ चित्रपटांना संगीत दिले होते. ही संख्या १९५९ साली *बरखा, बाजीगर, कमांडर, डाका, गेस्ट हाऊस, कल हमारा है, कंगन, मॅडम एक्स.वाय.झेड., नया संसार, काली टोपी लाल रूमाल* या दहा चित्रपटांना संगीत देऊन त्यांनी एकाने ओलांडली. १९५८ साली नऊ चित्रपटांना संगीत देऊन एकाही चित्रपटांतील त्यांच्या संगीताने लोकप्रियता मिळवली नव्हती. १९५९ साली दहापैकी पाच चित्रपटातील त्यांच्या संगीताने चांगलीच लोकप्रियता मिळवली. या पाच चित्रपटांपैकी एक चित्रपट म्हणजे मद्रासच्या ए. व्ही. एम.चा *बरखा*.



चित्रगुप्त



शकीला

१९५७च्या ए.व्ही.एम.च्या *भाभी* या चित्रपटाने चित्रगुप्तना देमार चित्रपटांच्या चाकोरीतून बाहेर काढून सामाजिक चित्रपटात प्रतिष्ठित केले. *बरखा*ने सामाजिक चित्रपटातील त्यांची ही प्रतिष्ठा १९५९ साली आणखीन वाढवली. *भाभी*मध्ये जगदीप व नंदा टीन एजर नायक-नायिकेच्या भूमिकेत चमकले होते. *बरखा*त त्या दोघांनी बहीण-भावाची भूमिका केली होती. आणि 'वो दूर जो नदिया बहती है, वहाँ इक अलबेली रहती है...' हे रफी व लता यांनी गायलेले बहीण भावाचे गाणे या चित्रपटात त्या दोघांवर चित्रित करण्यात आले होते. शुभा खोटे या चित्रपटात जगदीपची नायिका होती. पण या चित्रपटाची कथा बहीण-भावांची असल्यामुळे शुभा खोटेच्या भूमिकेहून नंदाच्या भूमिकेलाच या चित्रपटात अधिक वाव देण्यात आला होता. जगदीपच्या आधी मराठी व हिंदी चित्रपटात बालकलाकार असलेला अनंतकुमार तथा अनंत मराठे या चित्रपटातला जगदीपबरोबरचा आणखी एक नायक होता. पण गाण्याच्या बाबतीत त्याच्या नायकाहून जगदीपच्या नायकालाच या चित्रपटात अधिक झुकतं माप देण्यात आलं होतं. रफीने गायलेली 'छोड़ भी दे मंझधार मे नाव...', 'प्यार किया नही जाता हो जाता है मेरी जाँ...' ही दोन गाणी या चित्रपटात जगदीपवर चित्रित करण्यात आली होती. या दोन गाण्यांशिवाय रफीने एकट्याने गायलेले 'सूर बदले कैसे कैसे देखो...', 'किस्मत की शहनाई...' हे आणखी एक गाणे या चित्रपटात होते आणि ते या चित्रपटात पार्श्वगीत म्हणून वापरण्यात आले होते. रफीबरोबर एक द्वंद्वगीत गात असताना लताबाईंनी या चित्रपटात मुकेशबरोबरदेखील एक द्वंद्वगीत गायले होते. या गाण्याचे बोल होते 'इक रात मे दो दो चांद खिले, इक घुंघट में इक बदली में...' अनंत मराठे व नंदा यांच्यावर हे गाणे चित्रित करण्यात आले होते.

रफी, मुकेश यांच्याबरोबर एकेक द्वंद्वगीत गात असताना लताबाईंनी या चित्रपटातील 'बरखा बहार आई, बुंदो के हार लाई...', 'उंचे पर्वत गहरे सागर...', 'तडपाओगे तडपा लो...', 'हम तडप तडप कर भी...' व 'पुछूंगी एक दिन पिछले प्रहर...' ही चार गाणी एकटीने गायली होती. आणि ती चांगली लोकप्रियदेखील ठरली होती.

कंगन(१९५९):

राजेंद्र कृष्ण यांचीच गीतरचना लाभलेला १९५९चा चित्रगुप्त यांचा आणखी एक सुरीला चित्रपट म्हणजे *कंगन*. अशोककुमार व निरूपा रॉय या पन्नास व साठीच्या दशकातल्या लोकप्रिय जोडीची या चित्रपटात प्रमुख भूमिका होती. चाळीसच्या दशकात अशोककुमार व लीला चिटणीस यांची जोडी आपल्या चित्रपटात लोकप्रिय होती. या जोडीला घेऊन बॉम्बे टॉकीजने १९३९ साली *कंगन* या नावाचा एक चित्रपट निर्माण केला होता. लीला चिटणीस तेव्हा आपल्या चित्रपटातील एक लोकप्रिय नायिका होती. १९४८च्या *शहीद*द्वारा ती नायिकेची चरित्र-अभिनेत्री बनली. आणि आपल्या चित्रपटात आईची भूमिका करू लागली. अशोककुमार त्यानंतर १९६०पर्यंत आपल्या चित्रपटात नायक म्हणून वावरत होता. आणि निरूपा रॉयबरोबर त्याची जोडी हिट ठरली होती. १९३९साली लीला चिटणीसबरोबर *कंगन* या नावाचा एक चित्रपट केल्यानंतर १९५९साली निरूपा रॉयबरोबर *कंगन* या नावाचा दुसरा चित्रपट त्याने केला आणि त्यानंतर १९७१ साली *कंगन* या नावाचा तिसरा चित्रपट. तेव्हा काही तो तरुण नायक राहिला नव्हता. नायकाचा चरित्र अभिनेता बनला होता. आणि संजीवकुमार व माला सिन्हा यांची भूमिका असलेल्या १९७१च्या तिसऱ्या *कंगन*मध्ये माला सिन्हाच्या पतीची चरित्र-भूमिका त्याने केली होती. १९५९च्या *कंगन*ची कथा घेऊन १९७५ साली *उलझन* या नावाचा एक चित्रपट निर्माण झाला होता. *कंगन* नावाच्या तीन चित्रपटांत भूमिका करणारा अशोककुमार या चित्रपटात संजीवकुमार व सुलक्षणा पंडित यांच्याबरोबर एक चरित्र-अभिनेता होता. १९५९च्या *कंगन*ची कथा शशी भूषण यांची होती. आणि गुरूदत्तना ती आवडली होती. त्यांना या कथेवरून स्वतः चित्रपट निर्माण करायचा होता. पण तो योग जुळून आला नाही. त्यानंतर महेश भट्ट यांचे वडील नानाभाई भट्ट यांनी अशोककुमार, निरूपा रॉय, पूर्णिमा, भगवान, तिवारी, शम्मी यांना घेऊन या कथेवरून चित्रपट निर्माण केला. अशोककुमारची या चित्रपटातील भूमिका गीत विरहित होती. आणि भगवानदादांची भूमिका संगीतमय होती. ती

(पान नं. ५२ वर)

(पान नं. ४२ वरून)

भगवान डान्समध्ये फुलली होती. रफीची दोन गाणी या चित्रपटात होती. या दोन गाण्यांपैकी 'जिंदगी जिसने तुझे दी आँधिया गम की चलती है, चलने भी दे जल सके जब तक शम्मा...' हे गाणे एक सोलो गाणे होते. आणि ते भगवान दादांच्यावर चित्रित करण्यात आले होते. दुसऱ्या गाण्याचे बोल होते 'जबाब नही, जबाब नही, गोरे मुखडे पर तील काले का...' हे गाणे रफीने गीता दत्तबरोबर गायले होते. आणि ते भगवानदादा आणि आजच्या चित्रपटातील व दूरदर्शन मालिकांतील चरित्र अभिनेत्री शम्मी अंटी यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. रफीबरोबर एक गाणे गात असताना गीता दत्तने या चित्रपटातील 'बीस बरस तक लाख संभाला चल गया पर जानेवाला...' व 'आग लगाना क्या मुश्किल है...' ही दोन गाणी एकटीने गायली होती. आणि ती हेलनवर चित्रित करण्यात आली होती. हेलनच्या नृत्यातील झटका या दोन्ही गाण्यात होता. गीता दत्तने या चित्रपटातील 'लिख पढ, पढ लिख, लिख पढ के अच्छा सा राजा बेटा बन...' हे आणखी एक गाणे उषा मंगेशकर यांच्याबरोबर गायले होते आणि ते निरूपा रॉय व बालतारका डेझी इराणी यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. मेरे बाले की पलको में आ आ निंदिया रानी हो तेरा भला...' हे या चित्रपटातील गाणे म्हणजे एक अंगाई गीत होते. ते कोणी गायले होते याची माहिती उपलब्ध नाही. लताबाईंनी या चित्रपटातील 'मुस्कुराओ के जी नही लगा, पास आओ के जी नही लगता...' व 'देखो पनिया भरन के बहाने चल जमुना की ओर राधा...' ही दोन गाणी गायली होती. 'मुस्कुराओ...' निरूपा रॉयवर चित्रित करण्यात आले होते. 'देखो पनिया भरन के बहाने...' हे गाणे म्हणजे एक नृत्यगीत होते आणि ते पूर्णिमावर चित्रित करण्यात आले होते.

जगदीश राजला अनेक चित्रपटात आज आपण पोलीस इन्स्पेक्टरच्या भूमिकेत पाहतो. १९५६च्या *सी.आय.डी.*त त्याने सर्वात प्रथम पोलीस इन्स्पेक्टरची भूमिका केली. आणि *कंगन*नंतर ही भूमिका त्याची हुकमी भूमिका बनली.

वाट चुकलेला ऑफिसर

फारुख नडियादवाला निर्मित, नईम शा दिग्दर्शित *ऑफिसर* हा चित्रपट अल्फ्रेड हिचकॉक दिग्दर्शित *व्हर्टिगो* (१९५८) या चित्रपटाची सुधारित भारतीय आवृत्ती आहे. *हेरा-फेरी* नंतर सुनील शेट्टीचे यश ॲनकॅश करण्यासाठी म्हणून डब्यात गेलेल्या या अपूर्ण चित्रपटाला प्रदर्शित करण्यात आले.



स्पेशल प्रोटेक्शन युनिटमध्ये काम करणारा सागर (सुनील शेट्टी) इमानदार आणि बहारदार आहे. त्यावर श्रीमंत प्रताप राय (डॅनी) आपली मनोरुग्ण बायको मीनलवर (रविना टंडन) लक्ष ठेवायची जबाबदारी सोपवतो. आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या मीनलला सागर वाचवतो. मीनलला सागर आवडू लागतो. ती त्याला लग्नाविषयी विचारते. सागरच्या निर्णयाला वेळ लागत असल्याने मीनल आत्महत्या करते आणि सागर अस्वस्थ होतो. उंचीवर गेल्यावर सागरला उंचीचा त्रास (फोबिया) असतो. मनःशांतीसाठी तो त्याचा पालक असलेल्या लोबोबरोबर गोव्याला जातो. तेथे परिणिताला (पुन्हा एकवार रविना टंडन) भेटतो. त्याला तिच्यात मीनलची छबी दिसू लागते. प्रताप रायदेखील परीला, स्वतःची बायको म्हणतो. परी खरं कोण? या सत्याचा शोध घेताना सागरसमोर एक वेगळंच सत्य उलगडते ते *ऑफिसर*मध्ये पहायला मिळते.

*व्हर्टिगो*वरून कथानक घेतल्याने *ऑफिसर*ला पटकथा नाही. हे सरळ स्पष्ट आहे. लेखक, संवाद आणि दिग्दर्शनाची जबाबदारी नईम शा यांनी सांभाळली आहे. त्यात सुरुवातीला मांडलेल्या दोन गोष्टी वगळता दिग्दर्शनात बऱ्याच त्रुटी आढळतात. मुख्य म्हणजे राकट, जाड आणि लांब केसांचा जुना सुनील शेट्टी आणि थोडीशी अंगाने भरलेली सध्याची रविना यांची अदाकारी लोबो हे पात्र उगाचच आहे. त्याच्या वजा अस्तित्वाने चित्रपटात काहीच फरक पडला नसता. 'लडकी...' गाण्याने प्रसिद्धी पावलेल्या रविनाला दिलेलं 'शहर के लडके...' या डोकेदुखी गाण्याने चित्रपटातील कमकुवतता प्रकर्षाने दिसून येते.

दीपक चौधरी, साहिद राही, नबाब आरजू लिखित गाण्यांना दीपक चौधरी यांनी संगीतबद्ध केलं आहे. पैकी 'फुलों से रंग...' हे गाव श्रवणीय आहे.

कलाकारांत सुनील, रविना नेहमीप्रमाणे आहेत. रविनाचे अंगप्रदर्शन आणि काही जवळकीची दृश्ये गल्लाभरू दिसून येतात. डॅनी (बऱ्याच दिवसांनी दिसला), शेहजाद खान, शादाब खान आपल्या भूमिकेत ठसा उमटवतात. सदाशिव अमरापूरकर वाया जातो.

एकंदरीत पूर्वार्धातील ऑफिसरपेक्षा उत्तरार्धातील ऑफिसर चपळ दिसून येतो.

हदः सहनही होत नाही आणि...

संदीप शिंदे, थाम्पी कन्नामथानम् या नवख्या निर्माता-दिग्दर्शकांनी *हद* हा चित्रपट देऊन पाहणाऱ्यांच्या मर्यादा ताणण्याचा भरपूर प्रयत्न केला आहे.

आईपासून ताटातूट झालेला मुलगा मनात आईविषयी द्वेष भरून गुन्हेगारी जगतात प्रवेश करतो आणि तेथून पुन्हा आपल्या आईकडे वळतो हे कथानक आहे. या सरळमार्गी कथानकाला उगाचचे क्लेशकारक फाटे म्हणून अंडरवर्ल्डचे वैमनस्य, गिरणी समस्या, अपहरण जोडलेले आहेत. सोबत गाण्याची अनावश्यक पेरणी अधिक कंटाळाजनक ठरते.

कधीही न पाहिलेले लोकेशन आणि वेगळ्या पद्धतीची हाणामारी वगळता. मुळात कमकुवत असलेल्या या चित्रपटात उल्लेखनीय काहीच नाही. कलाकारात जॅकी श्रॉफ, शरद कपूर, सुमन रंगनाथन, आयेषा जुल्का, विक्रम गोखले आणि किरणकुमार यांनी डुचमळलेल्या या कथा-घड्याला सावरण्याचा असफल प्रयत्न केला आहे.

□ हर्षदा वेदपाठक